JAWAHAR EDUCATION SOCIETY runs

# SUWALAL PATNI

## ARTS & COMMERCE COLLEGE PULGAON

( Establishment in 1964)

Accredited B Grade by NAAC



- Affiliated to Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur
- Recognized by University Grants Commission under 2F & 12 B
- NAAC Accredited 'B' Grade Institution

# PROSPECTUS

## प्रस्तावना

पुलगाव व सभोवतालच्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेण्याबाबत कोणत्याही प्रकारची व्यवस्था नसताना १९६४ मध्ये श्रद्धेय श्री. बंसीलालजी पाटणी यांनी पुलगाव परिसरात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने जवाहर शिक्षण संस्थेची स्थापना केली व या संस्थेच्या विद्यमाने वर्धा जिल्हामध्ये सात माध्यमिक शाळा व एक कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले. महाविद्यालयाचे उद्घाटन तत्कालीन मा. शिक्षणमंत्री स्व. एन. सी. छागला यांचे हस्ते करण्यात आले. तेव्हापासून आजतागायत हे महाविद्यालय केवळ वर्धा जिल्हाच नाही तर पुलगाव लगत असलेल्या अमरावती जिल्हातील विद्यार्थ्यांनासुद्धा उच्चशिक्षणाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले आहे. पुलगाव परिसरातील उच्च शिक्षण देणाऱ्या या एकमात्र महाविद्यालयाला पुलगावकरांनी साथ दिली. महाविद्यालयसुद्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध कलागुण व कार्यक्रमांच्या माध्यमातून कार्यरत आहे. महाविद्यालयाची स्व. पन्नालालजी पाटणी स्मृती भावगीत स्पर्धा ही नागपूर विद्यापीठातील एकमेव संपूर्ण विदर्भांत नावलौकिक मिळवणारी स्पर्धा ठरली. महाविद्यालयाच्या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रमास तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक आवर्जून उपस्थित राहायचे. नागपूर विद्यापीठाच्या उत्कृष्ट निकालासह महाविद्यालयाने आजतागायत अनेक मान्यवर व्यक्ती समाजाला दिले आहे.

संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री. अजितकुमार पाटणी तसेच प्राचार्य व प्राध्यापकवृंद विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव तत्पर असतात. शहराच्या वर्दळीपासून दूर निसर्गरम्य वर्धा नदीच्या पारिसरात महाविद्यालयाची प्रशस्त इमारत शिक्षणाकरिता उपलब्ध आहे.

**“ येथ हो उत्तरोत्तरू। ज्ञान बिजाचा विस्तारू।। ”**

हे आमचे ब्रीद वाक्य असून त्या नुसार आम्ही पाउले उचललेली आहेत.

आपले स्वागत आहे !

## वैशिष्टये

- नॅक द्वारा ब श्रेणीने मानांकित महाविद्यालय
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठद्वारा संलग्नित.
- महाराष्ट्र सरकारद्वारा १०० टक्के अनुदानित.
- उच्चविद्याविभूषित, अनुभवी व पूर्णकालिक प्राध्यापक वर्ग.
- विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम.
- भारत सरकारद्वारा लागू सर्व शिष्यवृत्ती व सवलती.
- व्यवसाय मार्गदर्शन व इतर स्पर्धात्मक परीक्षासंबधी मार्गदर्शन.

## संस्था अध्यक्षांचे मनोगत



मा. अजीतकुमार पाटणी
अध्यक्ष

माझ्या प्रिय विद्यार्थ्यांनो !

ज्ञानामुळं मती, गती, आणि उन्नतीचे मार्ग खुले होतात असे सर्वच महापुरुषांचे मत आहे. यांच्या विचारांनुसार १९६४ ला ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानाचे दरवाजे उघडे करण्यासाठी सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. अनेक अडचणींवर मात करीत आपल्या सर्वांच्या सहकार्याने आज महाविद्यालयाला यशाचे शिखरे गाठता आले आहे. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. त्यानुसार ज्ञानक्षेत्रातील बदलाची दखल आपण घेतलीच पाहिजे. स्पर्धा, तंत्रज्ञान, ज्ञान-विज्ञान, उद्योगाच्या क्षेत्रात आमचे विद्यार्थी सदा अग्रेसर राहतील या दृष्टीने आम्ही सदा प्रयत्नशील आहोत.

माझ्या संस्थेतील विद्यार्थी जगातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करतील. यशस्वी जीवन जगतील, अशी इच्छा आहे. ज्यांच्या प्रेरणेतून आम्ही घडलो. त्यांची प्रेरणा घेऊन त्यांचा आदर्श समोर ठेवून प्रत्येक विद्यार्थ्यांने पुढील वाटचाल करावी. तुमच्या जगण्याचा आम्हालाही गौरव वाटावा अशी नवी वाट निर्माण करावी. सामाजिक बांधिलकीचे पाईक बनून आपल्यासाठी कार्य करणाऱ्या महापुरूषांचे ऋण फेडावे, अशी अपेक्षा आहे. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो, धन्यवाद !

## प्राचार्यांचे दोन शब्द



डॉ. भूषण म. रामटेके
कार्यकारी प्राचार्य

आजचे युग हे स्पर्धात्मक युग आहे. या स्पर्धात्मक युगात शिक्षणाद्वारे विद्यार्थी स्वतःला घडवू शकतो. जी स्वप्ने पाहिली ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी महाविद्यालयीन शिक्षण हे महत्वाचे आहे. आजचे शिक्षण विद्यार्थीमुख आहे. सुप्तावस्थेत असलेल्या त्यांच्या कलागुणांना वाव मिळवून देणारे महाविद्यालय त्यांच्यासाठी आधारकेंद्र आहे. आम्ही  आमच्याकडून तज्ज्ञ प्राध्यापकवर्गाद्वारे, ग्रंथालय, क्रीडांगण आणि एन.सी.सी. युनिटद्वारे त्यांला एक जबाबदार व सक्षम नागरिक बनविण्यासाठी कटिबद्ध आहोत. पुलगाव शहरातील सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालय हे पहिले व प्रतिष्ठाप्राप्त महाविद्यालय आहे. येथे अभ्यासक्रमीय कार्याबरोबरच वादविवाद स्पर्धा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच विविध सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. पुस्तकांनी समृद्ध ग्रंथालय, प्रशस्त क्रीडांगण व निसर्गरम्य परिसरात उभी असलेली महाविद्यालयाची प्रशस्त इमारत विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणारी आहे.

## ध्येयपथ व दूरदृष्टिकोण

- अल्प खर्चात उच्च दर्जाचे शिक्षण देणे, जेणे करून गरिबातला गरीब विद्यार्थीही या शिक्षणाचा लाभ घेऊ शकेल.
- मागासवर्गीय समाजाच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे, त्यासाठी उत्तम शिक्षणाच्या सोयी व वातावरण निर्मिती करणे.
- विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास, उच्च संशोधन वृत्तीचे वृद्धीकरण करण्याकरीता विविध प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्र, कार्यशाळा आणि विविध विषयांच्या
- अनुषंगाने प्रकल्प राबविणे व मार्गदर्शन करून प्रोत्साहित करणे.
- कला व वाणिज्य शाखेतील सामाजिकदृष्ट्या अद्यावत ज्ञानाचे संदेशवहन करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे.

## संगणक केंद्र व भाषा प्रयोगशाळा

महाविद्यालयात इंटरनेट कनेक्टीव्हिटी सह सुसज्ज संगणक प्रयोगशाळा उपलब्ध असून अभ्यासक्रमाच्या आवश्यकतेनुसार डीजीटल क्लासरूम, भाषाशास्त्राचे सॉफवेअर लॅबमध्ये कार्यरत आहेत.

## ग्रंथालय व वाचनकक्ष

महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला Dr. A. P. J. Abdul Kalam Learning Resource Center (Library) असे नाव देण्यात आले आहे. विविध विषयावरील उपयुक्त अशा ग्रंथानी सुसज्ज असे महाविद्यालयाचे ग्रंथालय आहे. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असा ग्रंथसंग्रह ग्रंथालयात असून दरवर्षी त्यात वाढ होत आहे. एस.सी., एस.टी. विद्यार्थ्यांना बुकबॅक योजने अंतर्गत संपूर्ण सत्राकरिता मोफत पुस्तके वापरण्यास मिळू शकतात. क्रमिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त दैनिक, साप्ताहिक, मासिक , स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन पुस्तके व संदर्भ ग्रंथ वाचनकक्षात उपलब्ध आहेत. ग्रंथालयीन नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.



## करिअर मार्गदर्शन व प्लेसमेंट कक्ष CAREER GUIDANCE & PLACEMENT CELL

महाविद्यालयाच्या करिअर कौन्सिलिंग व प्लेसमेंट सेल द्वारा विद्यार्थ्यांना उद्योग व रोजगाराभिमुख मार्गदर्शन केल्या जाते. करीअरबद्दल जागरूकता निर्माण करणे, विद्यार्थ्यांची आवड व आवश्यकता लक्षात घेऊन अतिथी व्याख्याने, संवादसत्र, औद्यागिक भेट, कार्यशाळांचे आयोजन केल्या जाते. सेलद्वारे सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट कार्यक्रमाचे आयोजन करते.

## करिअर कट्टा CAREER KATTA

महाविद्यालय महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ऽ करिअर कट्टा ऽ हा कार्यक्रम चालविते. या साठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी २ रोजगाराभिमुख अभ्यासक्रम मोफत दिल्या जातात. त्या करिता विद्यार्थ्यांना ४०० रू. शुल्क भरून नोंदणी करणे आवश्यक आहे. अतिरीक्त माहिती करिता करीअर कट्टा कक्षाशी संपर्क साधावा.

## उपचारात्मक प्रशिक्षण REMEDIAL COACHING

अभ्यासात कमजोर असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता उपचारात्मक प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्यातील कमतरतेची कारणे जाणून विविध माध्यमांद्वारे व्यावहारिक ज्ञान वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच विविध स्पर्धा परीक्षांकरिता विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन केल्या जाते.

## खेळ व क्रीडा GAMES & SPORTS

नियमित अभ्यासक्रमा व्यतिरीक्त प्रादेशिक, राज्य, राष्ट्रिय स्तरांवरील क्रीडा स्पर्धांकरिता विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून त्या अनुषंगाने त्यांची तयारी करून घेतल्या जाते. महाविद्यालय स्तरावर सुद्धा क्रिकेट, व्हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी सारख्या मैदानी तसेच एथलॅटीक व इनडोअर खेळांच्या स्पर्धा घेतल्या जाते. वार्षिक क्रीडा सप्ताहाचे आयोजन क्रीडा विभार्गाद्वारे केल्या जाते. विद्यापीठ नियमानुसार २५ पैकी प्रोत्साहन गुण यशस्वी विद्यार्थ्याला मिळू शकतात.

## महिला विकास कक्ष WOMEN DEVELOPMENT CELL

महाविद्यालयाचे परिसरामध्ये सौहार्दपूर्ण वातावरण राखण्यासाठी महिला विकास कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. हा कक्ष कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ ;प्रतिबंध आणि निवारण कायदा २०१३ नुसार तक्रार निवारण समिती म्हणून सुद्धा कार्य करते.

## स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन GUIDANCE FOR COMPETITIVE EXAMS

एमपीएससी, युपीएससी, बॅकिंग, रेल्वे आणि स्टॉफ सिलेक्शन या सारख्या स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले जाते. त्या करीता स्पर्धा परिक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, नागरी प्रशासकिय सेवांबाबत माहीती प्रदान करून विद्यार्थ्यांची आवड व आवश्यकता लक्षात घेऊन अतिथी व्याख्याने, संवादसत्र, चर्चासत्र व कार्यशाळांचे आयोजन केल्या जाते.

## औद्योगिक भेट व अभ्यास दौरा INDUSTRIAL VISIT & STUDY TOUR

विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या अनुभवांमध्ये विविधता आणण्याकरिता आणि समृद्ध करण्यासाठी महाविद्यालय औद्योगिक भेटी व अभ्यास दौरे आयोजित करते. या व्दारे अनौपचारिक वातावरणात नवीन दृष्टिकोन समकालीन करण्याची संधी प्रदान करण्यात येते. विद्यार्थी नवीन कौशल्ये, मूल्ये, आणि सामान्य ज्ञान आत्मसात करण्याची त्यांची क्षमता वाढवू शकतात. विद्यार्थ्यांना औद्योगिक भेटी द्वारे अनुभव अनुभुतीतून अधिक जलद ज्ञान प्राप्त करतात.



## अभ्यासक्रम अतिरिक्त उपक्रम

महाविद्यालयामध्ये सर्वच महापुरूषांची जयंती, पुण्यतीथी, लोकसंख्या दिन, एड्स दिन, शिक्षक दिन, साक्षरता दिवस, युवा दिन, शहिद दिन, दहशदवाद व हिंसाचार विरोधी दिन, सद्भावना दिवस, राष्ट्रीय मतदार दिन,राष्ट्रीय संकल्प दिन, राष्ट्रीय एकता दिन, राष्ट्रीय एकात्मता दिन, संविधान दिन, योगा दिवस, एन.सी.सी. दिन तसेच शासन निर्देशानुसार सर्व प्रमुख कार्यक्रम साजरे केले जातात. तसेच वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजीत केल्या जातो. कार्यक्रमांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, पारितोषिक, प्रमाणपत्र तसेच विद्यापीठ नियमानुसार १० पैकी प्रोत्साहन गुण प्रदान केले जातात.

## हार्दिक अभिनंदन

## HEARTY CONGRATULATION




### कु. इंद्रायणी विलास तितरे, बी.कॉम भाग ३

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर च्या वाणिज्य स्नातक (बी.कॉम.) उन्हाळी वार्षिक परीक्षेमध्ये सहावे मेरीट स्थान प्राप्त केल्या बद्दल कु. इंद्रायणी विलास तितरे हिचे हार्दिक अभिनंदन !



## पंचधारा वार्षिकांक

विद्यार्थ्यांमधील लेखन गुणांना वाव मिळावा यासाठी महाविद्यालयाद्वारे पंचधारा वार्षिकांकाचे प्रकाशन करण्यात येते. ललित साहित्या व्यतिरिक्त अभ्यासक्रमांशी संबधित विषयावर लेखन, छायाचित्रण, चित्रकला, काव्य यांनाही वार्षिकांकात योग्य स्थान दिल्या जाते. पूर्ण कागदाच्या एकाच बाजूस सुवाच्च अक्षरात लिहिलेले साहित्य विद्यार्थ्यांनी २० नोव्हेबरपूर्वी संबधित प्राध्यापकांकडे सुपूर्द करावे.



# SUBJECT OFFERED

## UNDER GRADUATE COURSES

### B.A.

**BACHELOR OF ARTS**

3/4 years- 6/8 Semester Degree Course

AS PER NEW EDUCATION POLICY-2020

### B.Com.

**BACHELOR OF COMMERCE**

3/4 years- 6/8 Semester Degree Course

AS PER NEW EDUCATION POLICY-2020

## POST GRADUATE COURSES

### M.A.

**MASTER OF ARTS**

2 years- 4 Semester PG Degree Course

AS PER NEW EDUCATION POLICY-2020

- ENGLISH
- SOCIOLOGY

### M.Com.

**MASTER OF ARTS**

2 years- 4 Semester PG Degree Course

AS PER NEW EDUCATION POLICY-2020

## SUBJECT OFFERED

### VALUE ADDED COURSES

# Skill India Authorised Training Center

**नोकरीसाठी सहाय्यभूत असणारे भारत सरकार द्वारा उपकृत Skill India प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

- **Tally ERP 9**
- **Retail Management**
- **Banking**
- **Office Management**

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

# कला विभाग

## बी.ए. - कला स्नातक    B.A. - BACHELOR OF ARTS

**प्रवेश पात्रता : कोणत्याही विद्याशाखेतून १२ वी उत्तीर्ण** | **कालावधी :४ वर्ष** | **माध्यम : मराठी/हिंदी/English**

**अभ्यासक्रम कालावधी**

बी.ए.प्रथम वर्ष (1 व 2 सेमिस्टर) बी.ए. द्वितीय वर्ष (3 व 4 सेमिस्टर)
बी.ए.तृतीय वर्ष (5 व 6 सेमिस्टर) बी.ए.चतुर्थ वर्ष (7 व 8 सेमिस्टर)

विषेश सुचना - कमाल सात वर्षाच्या कालावधीत अभ्यासक्रम पुर्ण करणे आवश्यक राहील.

**मेजर विषय**

१. मराठी २. हिंदी ३. इंग्रजी ४. समाजशास्त्र ५. राज्यशास्त्र ६. अर्थशास्त्र ७. इतिहास

**अभ्यासक्रम स्किम**

1. Major Subject
2. Minor Subject
3. Open Elective Course (OE)
4. Vocational Skill Course (VSC)
5. Skill Enhancement Course (SEC)
6. Ability Enhancement Course (AEC)
7. Indian Knowledge System Course (IKS)
8. Value Education Course (VEC)
9. Co-Curricular Course (CC)

## Multiple Entry & Exit Option

बी. ए. १ वर्ष (1 व 2 सेमिस्टर) 40 + 4 क्रेडीट पाइंट ले पुर्ण केल्यास - Certificate in B.Com. ने सन्मानित करण्यात येईल.

बी. ए. २ वर्ष (3 व 4 सेमिस्टर) 80 + 4 क्रेडीट पाइंट ने पुर्ण केल्यास - Diploma in B.Com. ने सन्मानित करण्यात येईल.

बी. ए. ३ वर्ष (5 व 6 सेमिस्टर) 124 + 4 क्रेडीट पाइंट ने पुर्ण केल्यास - Bachelor in B.Com. ने सन्मानित करण्यात येईल.

बी. ए. ४ वर्ष (7 व 8 सेमिस्टर) 164 + 4 क्रेडीट पाइंट ने पुर्ण केल्यास - Bachelor's with Research in B.Com. ने सन्मानित करण्यात येईल.

# वाणिज्य विभाग

## नविण शैक्षणिक धोरण अनुसार

### बी.कॉम. - वाणिज्य स्नातक B.Com. - BACHELOR OF Commerce

**प्रवेश पात्रता : कोणत्याही विद्याशाखेतून १२ वी उत्तीर्ण** | **कालावधी :४ वर्ष** | **माध्यम : मराठी/हिंदी/English**

**अभ्यासक्रम कालावधी**

बी.कॉम.प्रथम वर्ष (1 व 2 सेमिस्टर) बी.कॉम. द्वितीय वर्ष (3 व 4 सेमिस्टर)
बी.कॉम.तृतीय वर्ष (5 व 6 सेमिस्टर) बी.कॉम.चतुर्थ वर्ष (7 व 8 सेमिस्टर)

विषेश सुचना - कमाल सात वर्षाच्या कालावधीत अभ्यासक्रम पुर्ण करणे आवश्यक राहील.

**मेजर विषय**

1. Accounting and Taxation 2. Business Administration 3 Finance and Banking

**अभ्यासक्रम स्किम**

1. Major Subject
2. Minor Subject
3. Open Elective Course (OE)
4. Vocational Skill Course (VSC)
5. Skill Enhancement Course (SEC)
6. Ability Enhancement Course (AEC)
7. Indian Knowledge System Course (IKS)
8. Value Education Course (VEC)
9. Co-Curricular Course (CC)

### Multiple Entry & Exit Option

बि. कॉम १ वर्ष (1 व 2 सेमिस्टर) 40 + 4 क्रेडीट पाइंट ले पुर्ण केल्यास - Certificate in B.Com. ने सन्मानित करण्यात येईल.
बि. कॉम २ वर्ष (3 व 4 सेमिस्टर) 80 + 4 क्रेडीट पाइंट ने पुर्ण केल्यास - Diploma in B.Com. ने सन्मानित करण्यात येईल.
बि. कॉम ३ वर्ष (5 व 6 सेमिस्टर) 124 + 4 क्रेडीट पाइंट ने पुर्ण केल्यास - Bachelor in B.Com. ने सन्मानित करण्यात येईल.
बि. कॉम ४ वर्ष (7 व 8 सेमिस्टर) 164 + 4 क्रेडीट पाइंट ने पुर्ण केल्यास - Bachelor's with Research in B.Com. ने सन्मानित करण्यात येईल.

## महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया — College Admission Procedure

१. महाविद्यालयाचा ऑनलाईन व छापील प्रवेश अर्ज पूर्णतः भरलेला आवश्यक कागदपत्रासह आणि शुल्क भरल्याच्या पावतीसह तपासणी करीता सादर करावा.
२. पात्र उमेदवारांची यादी महाविद्यालयाच्या सूचनाफलकावर प्रदर्शित करण्यात येईल.
३. पात्र उमेदवारांनी वेळापत्रकानुसार दिलेल्या कालावधीत प्रवेश घ्यावा.

### विद्यापीठ नामांकन प्रकिया

महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेणारुया विद्यार्थ्यांना विद्यापीठाचा ऑनलाईन नोंदनी अर्ज भरावा लागेल. अर्ज सादर झाल्यावर जनरेट झालेल्या अर्जाची प्रिंट तसेच विद्यापीठ नामांकन शुल्क १४१/- रूपयेसह विहित मुदतीत महाविद्यालयात सादर करावा लागेल.

### ओळखपत्र

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ओळखपत्र दिल्या जाईल. विद्यार्थ्यांनी ते नियमितपणे सोबत बाळगावे.

### उपस्थिती

विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक विषयातील उपस्थिती ८० टक्के पेक्षा कमी नसावी. जे विद्यार्थी आजारपण, खेळ, एन.सी.सी. किंवा इतर महाविद्यालयीन कारणांनी गैरहजर राहतील त्यांना प्राचार्यांच्या पूर्वसूचनेने सुट दिल्या जाईल. जे विद्यार्थी ८० टक्केची अट पूर्ण करीत नाही त्यांना विद्यापीठ परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

### महाविद्यालय परीक्षा

महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणाऱ्या सर्व आंतरिक परीक्षा, असाईनमेंट व व्हायवा विद्यार्थ्यांनी देणे आवश्यक आहे.

नोट - १. या परीक्षांमध्ये २० टक्के पेक्षा कमी गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ३० रू. प्रती विषय दंड भरावा लागेल.
२. जे विद्यार्थी परिक्षेस गैरहजर राहतील त्यांना ३० रू. प्रती विषय दंड भरावा लागेल.

## विद्यापीठ परीक्षा

विद्यार्थ्यांनी प्रत्येक सेमिस्टर करीता विद्यापीठाचा परीक्षा फॉर्म दिलेल्या मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. विद्यापीठ परीक्षा अर्ज भरण्याबाबत सूचना वर्गात, सूचना फलकावर तसेच महाविद्यालयाच्या वेबसाईट वर देण्यात येईल. विहीत मुदतीत परिक्षा अर्ज न भरणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ नियमानुसार विलंब शुल्कासह अर्ज सादर करावा लागेल.

## शारीरिक व वैद्यकीय परीक्षा

विद्यापीठ नियमानुसार विद्यार्थ्यांची शारीरिक व वैद्यकयी चाचणी घेण्यात येईल. गैरहजर राहणारुऱ्यास दंड भरावा लागेल.

## विद्यार्थी-पालक-शिक्षक सभा

गुणवत्ता सुधार प्रक्रियेचा भाग म्हणुन महाविद्यालयात विद्यार्थी-पालक-शिक्षक सभा आयोजित करण्यात येते. या उपक्रमामुळे अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, सेवांची कार्यक्षमता व कामगिरीचे मूल्यांकन समजून घेण्यास मदत होते. सर्व पालकांनी सभेला नियमित उपस्थित राहून दर्जात्मक शिक्षणसाठी सूचना सभेत ठेवाव्या.

## राष्ट्रीय कॅडेट कोर (N.C.C.)

महाविद्यालयात २१ महाराष्ट्र बटालीयन एन. सी. सी. वर्धाच्या मार्गदर्शक तत्वानुसार एन. सी. सी. युनिट संचालीत करण्यात आलेले आहे. याद्वारे संरक्षण व सामाजीक सेवा स्वयंसेवाकांची नियुक्ती करण्यात येते. एन. सी. सी. युनिटच्या च्या योग्य कार्यपालनासाठी महाविद्यालयाव्दारे सहाय्यक एन. सी. सी. अधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. तसेच एन. सी. सी. युनिट सल्लागार समिती गठित केलेली असुन त्याद्वारे वेळोवेळी मार्गदर्शन केल्या जाते.

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

आजीवन शिक्षण व विस्तार विभागाची स्थापना रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या निरंतर प्रौढ शिक्षण आणि विस्तार विभागाच्या योजने अंतर्गत करण्यात आले आहे. पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथमवर्ष प्रवेशित विद्यार्थी यात ५० रू. शुल्क भरून सहभागी होऊ शकतात. विद्यापीठ मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रकल्प पुस्तक तयार करावे लागेल. प्रकल्प पुस्तकाच्या मूल्यांकनाच्या आधारे विद्यार्थ्यांना १० पैकी प्रोत्साहन गुण प्रदान करण्यात येते.

## विद्यार्थी परिषद

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१६ मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयात दरवर्षी विद्यार्थी परिषदेची स्थापना केली जाते.

## महाविद्यालयात प्रवेशासाठी अर्ज कसा करावा    How to Apply for Admission in the College

१. प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचा.
२. महाविद्यालयात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांने महाविद्यालयाने जाहीर केलेल्या अंतिम तारखेपूर्वी महाविद्यालय कार्यालयातून विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

### आवश्यक कागदपत्र

प्रवेश अर्जासोबत खालील गोष्टी असणे आवश्यक आहे.

१. महाविद्यालयाचे प्रवेश आवेदन अर्ज
२. शाळा सोडल्याचा मूळ दाखला व ३ झेरॉक्स
३. पात्रता परीक्षेची-१२वी ची मूळ गुणपत्रिका व ३ झेरॉक्स
४. १० वी (एस.सी.सी.) गुणपत्रिकेच्या २ झेरॉक्स
५. जातीचे प्रमाणपत्र सत्यप्रत
६. आधार कार्ड सत्यप्रत
७. बॅक पासबूक ची सत्यप्रत
८. अधिवास प्रमाणपत्र सत्यप्रत
९. पासपोर्ट आकारातील ३ फोटो

1. College Admission Application Form
2. Leaving Certificate with 3 Xerox
3. HSC (12th) Original Marksheet with 3 Xerox
4. SSC (10th) marksheet - 2 Xerox
5. Xerox Copy of Caste Certificate
6. Xerox Copy of Aadhar Card
7. Xerox Copy of Bank Pass Book
8. Xerox Copy of Domicile Certificate
9. 3 Passport Size Photograph

### प्रवेशाचे वेळापत्रक

प्रवेश प्रक्रिया बाबत माहिती रा. तु. म. नागपूर विद्यापीठाची वेबसाईड ( http://www.rtmnupgadm.org) व विविध वृत्तपत्र तसेच महाविद्यालयाचा सूचना-फलक तसेच महाविद्यालयाची वेबसाईड (https://www.spcpulgoan.in) वर सुचित केल्या जाईल.

## शिष्यवृत्ती व सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नियम

विद्यार्थ्यांना आर्थिक सवलती, शिष्यवृत्ती यासाठी विहित नमुन्यामध्ये विशिष्ट मुदतीत अर्ज सादर करावे लागतात. त्याबाबतची माहिती प्रवेश घेतेवेळीच विद्यार्थ्यांने कार्यालयातून जाणून घेणे आवश्यक आहे. योग्यवेळी रीतसर व आवश्यक त्या कागदपत्रा सोबत अर्ज न दिल्यास शिष्यवृत्ती अथवा सवलत नामंजूर होण्याची शक्यता असते. शिष्यवृत्ती / सवलत नामंजूर झाल्यास पूर्ण शुल्क भरावे लागेल.

१. (ई.बी.सी.) राजश्री छत्रपती शाहू महाराज सवलत अनुदानित अभ्यासक्रमासाठी लागू आहे.
२. (ई.बी.सी.) राजश्री छत्रपती भााहू महाराज सवलत प्राप्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यापासून स्वतरू ऑनलाईन अर्ज भरून १५ दिवसाच्या आत अर्ज कार्यालयात सादर करावा व पावतीवर सही घ्यावी.
३. कोणतीही सवलत नसलेल्या विद्यार्थ्यांना अनुदानित अभ्यासक्रमाला प्रवेश घेतेवेळी पूर्ण फी भरावी लागेल.
४. विद्यार्थ्यांनी नोटीस बोर्डवरती वेळोवेळी लावलेल्या सूचना पाहणे आवश्यक आहे.
५. शिष्यवृत्ती फॉर्म ऑनलाईन आपण स्वतः भरून आणून ३० दिवसाच्या आत कार्यालयात सादर करावा व पावतीवर सही घ्यावी.
६. स्कॉलरशिप फॉर्मला आवश्यक प्रमाणपत्रे जोडावीत अपूर्ण अथवा चुकीचा फॉर्म स्वीकारल्या जाणार नाही.
७. आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक बँक खात्याशी लिंक असणे आवश्यक आहे.
८. शासनाच्या व विद्यापीठाच्या बदलत्या धोरणानुसार वेळोवेळी फी मध्ये बदल झाल्यास ती फी त्या सत्रासाठी लागू राहील. याबद्दल सर्व विदयार्थ्यांना हमीपत्र भरून दयावे लागेल.
९. शिष्यवृत्ती फॉर्म कार्यालयात जमा केल्यानंतर लिपिकाची स्वाक्षरी घ्यावी व ती पावती टी.सी. नेईपर्यंत व्यवस्थित ठेवावी.
१०. अनुदानित, अभ्यासक्रमात प्रवेशित विदयार्थ्यांचा फॉर्म समाजकल्याणकडून तपासल्यानंतर नामंजूर झाल्यास विद्यार्थ्यांना पूर्ण फी भरावी लागेल. या बाबतीत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही. व फी माफ केली जाणार नाही.
११. प्रथम वर्षामध्ये ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे. त्याच महाविद्यालयात पदवी पूर्ण होईपर्यंत शिष्यवृत्ती मिळेल. इतर महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही पूर्ण फी भरावी लागेल.
१२. तांत्रीक अभ्यासक्रम किंवा मुक्त विद्यापीठातून अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी महाविदयालयात प्रवेश घेतल्यास त्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. अश्या विद्यार्थ्यांना पूर्ण फी भरावी लागेल.
१३. शिक्षणात तीन किंवा चार वर्षापेक्षा जास्त खंड पडल्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही.
१४. वयोमर्यादा SC, ST साठी - ३५ वर्ष, OBC, VJNT साठी ३० वर्ष आहे. त्यापेक्षा अधिक वयाच्या विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. तसेच लग्न झाले असल्यास मॅरेज सर्टिफिकेट आवश्यक आहे.

१५. शिष्यवृत्ती व ई.बी.सी. सवलतीकरीता वर्गामध्ये ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे.
१६. प्रवेश रद्द केल्यास जमा केलेली प्रवेश फी परत मिळणार नाही.

## शिष्यवृत्ती साठी आवश्यक कागदपत्रे

१. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र झेरॉक्स
२. मागील वर्शाची परीक्षा पासची गुणपत्रिकेची झेरॉक्स
३. जात प्रमाणपत्राची झेरॉक्स
४. उत्पन्नाचा दाखला (मुळ प्रमाणपत्र),
५. राष्ट्रीयकृत बॅकेचा खाते क्रमांक
६. तीन पासपोर्ट साईज फोटो,
७. मागील वर्षीचा शिष्यवृत्तीचा आदेश क्रमांक,
८. आधार कार्डची झेरॉक्स,
९. अधिवास प्रमाणपत्र,
१०. मागील वर्षीच्या शिष्यवृत्तीचा फार्मचा युजर आय, डी व पासवर्ड

विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फा!ार्म नियत कालावधीच्या आत फॉर्म भरणे आवश्यक आहे. त्याकरिता जातीचे प्रमाणपत्र व उत्पन्नाचे प्रमाणपत्र प्रवश तारखेपासून १५ दिवसाच्या आत महाविद्यालयात सादर करावे व ऑनलाईन शिष्यवृत्ती फॉर्म भरून घ्यावा. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन न भरल्यास त्या विद्यार्थ्यांला नियमाप्रमाणे संपूर्ण शुल्क भरणे बंधनकारक राहील. व हे शुल्क दिल्याशिवाय त्याला विद्यापीठ परीक्षा आवेदन पत्र भरता येणार नाही.

## महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीबाबत नियम

१.प्राचार्य, प्राध्यापक व महाविद्यालयीन कर्मचारी यांचा आदर राखणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे.
२.निरनिराळया शैक्षणिक सवलती घेणारुया विद्यार्थ्यांनी दिलेली माहिती व आवेदन पत्रातील मजकूर संबंधी जबाबदारी विद्यार्थ्यांचीच राहील. सवलत रद्‌द झाल्यास नियमाप्रमाणे शुल्क देण्याचे बंधन विद्यार्थांवर राहील.
३.महाविद्यालयात शुल्क व इतर दंड ताबडतोब दिला पाहिजे. समस्या असल्यास प्राचार्याकडे लेखी आवेदनपत्र सादर करावे.
४.महाविद्यालयात विवादात्मक प्रश्न उदभवल्यास त्याबाबत प्राचार्यांचा निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.
५.महाविद्यालयाची मालमत्ता विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वापरावी अशी अपेक्षा आहे. महाविद्यालयाच्या मालमत्तेची हेतुपुरस्सर केलेली हानी किंवा दुरूपयोग याबददल कायदेशीर कार्यवाही केली जाईल.
६.महाविद्यालयाच्या परिसरात मादक पदार्थ, पान, तंबाखू, गुटखा, सिगरेट यांचे सेवन करता येणार नाही. तसेच भिंतीवर थुंकू नये. महाविद्यालयातील स्वच्छता विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने नितांत आवश्यक आहे.
७.विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या पालकांच्या स्थानिक पत्त्यात बदल झाल्यास कार्यालयास ताबडतोब कळविणे आवश्यक आहे.

८. प्रवेश घेतेवेळी उपलब्ध असलेल्या सोयी सवलती व्यतिरिक्त इतर कोणत्याही नवीन गोष्टींची मागणी विद्यार्थ्यांस व्यक्तिगत किंवा आंदोलनात्मक पातळीवर करता येणार नाही.

९. महाविद्यालयात मिळणाऱ्या कोणत्या शिष्यवृत्ती व सवलतींना आपण पात्र आहोत हे ठरविण्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्यांची व पालकांची आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी करावयाचे अर्ज व आवश्यक कागदपत्रे वेळेवर देण्याची जबाबदारी विद्यार्थी व पालकांची आहे.

१०. प्राचार्यांच्या पूर्व परवानगी शिवाय महाविद्यालयीन परिसरात कोणतीही माहिती अथवा सूचना प्रकाशित करू नये.

११. विद्यार्थ्याला महाविद्यालय सोडण्याचे मूळ प्रमाणपत्र दिल्यानंतर सहा महिण्याचे आत कोणत्याही सबबीखाली महाविद्यालय सोडण्याचे डुप्लीकेट प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यानंतर १००/- शुल्क भरून डुप्लीकेट प्रमाणपत्र (टी.सी.) प्राचार्यांच्या अनुमतीने मिळेल. मुळ प्रमाणपत्र हरविले वा नष्ट झाले अशी प्राचार्यांची खात्री पटल्याशिवाय डुप्लीकेट प्रमाणपत्र (टी.सी.) मिळणार नाही.

१२. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडून ग्रंथालयातून प्राप्त झालेले ओळखपत्र परिसरात स्वतः जवळ बाळगावे. ओळखपत्रावर स्वतःचा फोटो व प्राचार्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. ओळखपत्र हरविल्यास २०/- रितसर ग्रंथालयात भर!न नवीन ओळखपत्र मिळू शकेल.

१३. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या अशैक्षणिक चळवळीत व विध्वंसक कृतीत भाग घेऊ नये.

१४. खालील बाबींवर कोणत्याही विद्यार्थांचे नाव महाविद्यालयातून काढून टाकण्याचे किंवा त्यास योग्य कार्यवाही करण्याचे अधिकार प्राचार्यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

अ. महाविद्यालयाचे (College Dues) देणे असमर्थ ठरत असल्यास
ब. शैक्षणिक प्रगती व उपस्थिती कमी पडत असल्यास
क. विद्यार्थ्यांचे वर्तन असमाधानकारक वाटत असल्यास
ड. महाविद्यालयाच्या नियमांचे उल्लंघन करीत असल्यास
इ. महाविद्यालयीन कर्मच्याऱ्यांशी गैरवर्तणूक
ई. इतर विद्यार्थी व विद्यार्थिनीसोबत गैरवतणूक केल्यास.

१५. रा. तु. म. नागपूर विद्यापीठ वटहूकूम क्र. २

अ. जर एखादा विद्यार्थी गंभीर स्वरूपाच्या गैरवर्तणुकीबाबत दोषी ठरत असेल किंवा तो अशाच प्रकारच्या गैरवर्तणुकीचा पाठपुरावा करीत असेल तर प्राचार्य अशा विद्यार्थ्यांच्या पालकाला याची सूचना देवुन व गैरवर्तणुकीची गंभीरता लक्षात घेवुन त्या विद्यार्थ्याला महाविद्यालयातून काढून टाकू शकतील. तसेच परिक्षार्थी म्हणून पुढे होणाऱ्या विद्यापीठाच्या परीक्षेपासून वंचित करू शकतील आणि याबाबत प्राचार्याचा निर्णय अंतिम समजण्यात येईल.

ब. अनुच्छेद क्र. २ (Clause No.2)

उपरोक्त गैरवर्तणुकीच्या गुन्हयाबद्दल महाविद्यालयातून काढून टाकण्यात आलेल्या किंवा बाहेर घालवून दिलेल्या किंवा परीक्षेपासून वंचित केलेल्या, परीक्षेस अयोग्य ठरविलेल्या विद्यार्थ्याला अन्य महाविद्यालयात प्रवेश घेताना मागील प्राचार्यांची (ज्यांनी अपात्र घोषित करण्याचा निर्णय दिला) परवानगी घेणे आवश्यक राहील आणि जर विद्यार्थी त्याला महाविद्यालयातून काढून टाकल्याचे तथ्य जाणून बुजून लपवीत असेल तर तो कार्यकारी समितीच्या शिस्तभंग कार्यवाहीस पात्र ठरेल.

१६. सर्व विद्यार्थ्यांनी आपली वाहने महाविद्यालयीन प्रवेश गेट जवळील सायकल स्टॅंडवरच लावावी.
१७. महाविद्यालय परिसरात भ्रमणध्वनीचा (मोबाईल) वापर करू नये, किंवा त्याचा कोणालाही त्रास होणार नाही असे वर्तन करू नये.
१८. महाविद्यालयातर्फे घेण्यात येणाऱ्या शारीरिक शिक्षण वर्गामधे उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विद्यापीठ परीक्षेला पात्र ठरविण्यासाठी शारीरिक शिक्षण वर्गामधील ७५ टक्के उपस्थिती आवश्यक आहे.
१९. विद्यापीठ परीक्षा : विद्यापीठा तर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षासंबंधीचे नियम व त्यासाठी भराव्या लागणाऱ्या आवेदन पत्रासंबंधीची माहिती, सूचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येत असते. त्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे.
२०. महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मिळून महाविद्यालयाच्या परिसराव्यतिरिक्त बाहेर व बाहेरगावी कुठेही कार्यक्रम घेऊ नये. घेतल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.
२१. महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांनी विद्यार्थिनींचा सन्मान राखावा. स्त्री सन्मानाला कुठल्याही प्रकारची बाधा पोहचल्यास विद्यार्थ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

## महाविद्यालयाची वेबसाईट

- महाविदयालयाची वेबसाईट : **www.spcpulgaon.in**
- ग्रंथालयाची वेबसाईट : **https://sites.google.com/site/granthalaya64**
- विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम, स्टडी मटेरीयल, नमुना प्रश्न पत्रिका, प्रश्नसंच इत्यादी करीता ग्रंथालयाच्या वेबसाईट ला भेट दयावी.

## महाविद्यालय कार्यालयीन कामकाजाबाबतचे नियम

१. विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयाच्या कार्यालयाची वेळ सोमवार ते शनिवार ९.०० ते ५.०० असेल. तसेच दुपारी १ ते १.३० भोजन अवकाश वेळ आहे.
२. Bonafide, College Leaving Certificate तसेच इतर कुठल्याही प्रमाणपत्रासाठी संबंधित लिपिकाकडे रितसर अर्ज करून सूचनेनुसार ते प्रमाणपत्र घेवुन जावे.
३. प्रवेश घेतेवेळी घेतलेल्या विषयात बदल करून दिला जाणार नाही. जर प्रवेश रद्द केल्यास प्रवेश फी व इतर शुल्क परत मिळणार नाही.
४. विद्यार्थ्यांनी A.T.K.T. च्या नियमानुसार प्रवेश घेताना आपल्या जवळील सर्व गुणपत्रिका सादर करणे आवश्यक असते.

५. विद्यार्थ्यांनी A.T.K.T. च्या नियमानुसार प्रवेश घेतल्यास व हिवाळी परीक्षेत पास झाल्यास त्या गुणपत्रिकेची झेरॉक्स कार्यालयात द्यावी. अन्यथा त्याचा चालू वर्षाचा निकाल राखीव राहील.
६. प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नामांकन पत्र (Enrolment Form) १५ ऑगस्टपर्यंत किंवा नागपूर विद्यापीठाने ठरवून दिलेल्या तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे.
७. माननीय सरन्यायाधिश सर्वोच्च न्यायालय यांचे आदेश क्रमांक २४२९५/२००४ नुसार महाविद्यालयीन परिसरात रॅगिंग करणे कायदेशीर गुन्हा आहे. महाविद्यालयीन परिसरात रॅगिंग संदर्भात कोणतीही तक्रार आल्यास त्याची चौकशी करून दोषींवर निलंबनाची काठोर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
८. प्रवेश घेतांना जे विषय घेतले असतील तेच विषय परीक्षा आवेदन पत्रामध्ये नमूद करावे. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःहून बदल केल्यास त्याला महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.
९. ऑनलाईन नामांकन तसेच परीक्षा फार्ममध्ये नमूद केलेले विषय व वैयक्तिक माहिती तपासून घ्यावी व त्याची एक प्रत विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ ठेवावी.
१०. द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी रू १००/- विद्यापीठ शुल्क भरून पर्यावरणशास्त्र विषयाकरिता नोंदणी करणे अनिवार्य आहे. तसेच पर्यावरणशास्त्राच्या वर्गात उपस्थित असणे, प्रकल्प सादर करणे व परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यापीठाकडून पदवी मिळणार नाही यांची नोंद घ्यावी.
११. महाविद्यालयात महिला सुरक्षा समिती गठित झाली असून मुलींना शारीरिक अथवा मानसिक त्रास दिल्यास त्यांनी प्रा. डॉ. विद्या पी. चन्ने यांचेकडे तक्रार करावी.
१२. महाविद्यालयात तक्रार निवारण समिती गठित झाली असून विद्यार्थ्यांनी आपला तक्रार अर्ज प्राचार्य डॉ. भूषण म. रामटेके द्यावा.
१३. महाविद्यालयातर्फे दरवर्षी - पंचधारा - वार्षिकांकाचे प्रकाशन केले जाते. विद्यार्थ्यांनी आपले लेख, कविता, कथा मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत लिहून ३१ डिसेंबर पर्यंत प्रकाशन समितीकडे द्यावे. उत्कृष्ट निवडक साहित्य प्रकाशित केले जाईल.
१४. महाविद्यालयाने गणवेश निश्चित केला असल्यास विदयार्थ्यांना गणवेशात उपस्थित राहणे अनिवार्य राहील.
१५. समित्या-महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सहकार्यासाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. त्या समित्या त्या त्या विषयांशी संबंधित कामकाज करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संबंधित प्रभारी प्राध्यापकाशी संपर्क साधावा.
१६. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बाहेरील कुठल्याही व्यक्तीला परिसरात आणू नये ते गैरवर्तन समजले जाईल.
१७. संगणक कक्षात किंवा इतर विभाग प्रमुखांच्या कक्षात जाण्यापूर्वी संबधित प्रमुखांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## शुल्क संरचना

# Fee Pattern 2024-2025 & Onwards

| Courses - B. A. & B. Com. ( Aided) | | Part I | | | Part II | | | Part III | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Particular | Full Fee | EBC | GOI | Full Fee | EBC | GOI | Full Fee | EBC | GOI |
| 1 | Tution Fee | 800 | 00 | 00 | 800 | --- | 00 | 800 | --- | 00 |
| 2 | Admission Fee | 19 | 19 | 00 | 19 | 19 | 00 | 19 | 19 | 00 |
| 3 | Library Fee | 257 | 257 | 00 | 257 | 257 | 00 | 257 | 257 | 00 |
| 4 | Gymkhana Fee | 308 | 308 | 00 | 308 | 308 | 00 | 308 | 308 | 00 |
| 5 | Enrollment Fee | 141 | 141 | 141 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 |
| 6 | Extra Curricular Activity Fee | 219 | 219 | 00 | 219 | 219 | 00 | 219 | 219 | 00 |
| 7 | College Magazine Fee | 128 | 128 | 00 | 128 | 128 | 00 | 128 | 128 | 00 |
| 8 | Computer Training Fee | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | University Development Fund | 161 | 161 | 161 | 161 | 161 | 161 | 161 | 161 | 161 |
| 10 | University Sport Fee | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| 11 | Ashwamedh Fee | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| 12 | University Medical Aid Fund | 96 | 96 | 96 | 96 | 96 | 96 | 96 | 96 | 96 |
| 13 | University Student Aid Fund | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 |
| 14 | University Student Insurance | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 15 | Youth Festival Fee | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 16 | Identity Card Fee | 32 | 32 | 00 | 32 | 32 | 00 | 32 | 32 | 00 |
| 17 | Processing and Other Fee | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 18 | College Exam Fee | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| 19 | Environment Study Fee | 00 | 00 | 00 | 100 | 100 | 100 | 00 | 00 | 00 |
| | Total Fees | 2527 | 1727 | 764 | 2486 | 1686 | 723 | 2386 | 1586 | 623 |

टीप - चालू सत्रामध्ये विद्यापीठाद्वारे शुल्क संरचनेत बदल केल्यास तेवढे शुल्क भरणे बंधनकारक राहील.

# शुल्क संरचना

# Fee Pattern 2024-2025 & Onwards

| Post Graduation Courses - (UnAided) | | M.A. Part I & Part II | | | M.Com. Part I & Part II | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Particular | Full Fee | EBC | GOI | Full Fee | EBC | GOI |
| 1 | Tution Fee | 9924 | 00 | 00 | 8820 | 00 | 00 |
| 2 | Admission Fee | 257 | 257 | 00 | 257 | 257 | 00 |
| 3 | Library Fee | 514 | 514 | 00 | 514 | 514 | 00 |
| 4 | Gymkhana Fee | 385 | 385 | 00 | 385 | 385 | 00 |
| 5 | Enrollment Fee | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | Extra Curricular Activity Fee | 309 | 309 | 00 | 309 | 309 | 00 |
| 7 | College Magazine Fee | 128 | 128 | 00 | 128 | 128 | 00 |
| 8 | Computer Training Fee | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | University Development Fund | 1445 | 1445 | 1445 | 1445 | 1445 | 1445 |
| 10 | University Sport Fee | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| 11 | Ashwamedh Fee | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| 12 | University Medical Aid Fund | 74 | 74 | 74 | 74 | 74 | 74 |
| 13 | University Student Aid Fund | 122 | 122 | 122 | 122 | 122 | 122 |
| 14 | University Student Insurance | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 15 | Youth Festival Fee | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 16 | Identity Card Fee | 26 | 26 | 26 | 26 | 26 | 26 |
| 17 | Processing and Other Fee | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 18 | College Exam Fee | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| 19 | Environment Study Fee | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | Total Fees | 13470 | 3546 | 1953 | 13470 | 3546 | 1953 |

टीप - चालू सत्रामध्ये विद्यापीठाद्वारे शुल्क संरचनेत बदल केल्यास तेवढे शुल्क भरणे बंधनकारक राहील.

## महाविद्यालयातर्फे देण्यात येणारे विविध पारितोषिक

| | |
|---|---|
| स्व. बंसीलालजी सुवालालजी पाटणी स्मृतिप्रीत्यर्थ<br>अध्यक्ष, जवाहर एज्युकेशन सोसायटी द्वारा | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.ए. अंतिम वर्षामध्ये सर्व विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| स्व. बंसीलालजी सुवालालजी पाटणी स्मृतिप्रीत्यर्थ<br>अध्यक्ष, जवाहर एज्युकेशन सोसायटी द्वारा | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.कॉम. अंतिम वर्षामध्ये सर्व विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| Dr. S.R. Ranganathan, Best Libray User Award<br>ग्रंथालय प्रमुख डॉ. किशोर मो. ढुमणे यांचे कडून | जे विद्यार्थी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतील अशा विद्यार्थ्यांना ग्रंथालय विभागातर्फे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| **Dr. A.P.J. Abdul Kalam, Best Redear Award**<br>स्व. किशोरराव अवदुतराव उमरतकर, पहूर यांचे स्मृतिप्रीत्यर्थ<br>ग्रंथालय प्रमुख डॉ. किशोर मो. ढुमणे द्वारा | वाचनाभिरूची वाढविण्याच्या दृष्टीकोणातुन जे विद्यार्थी ग्रंथसंपदेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतील अशा विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| **Augst Comte, Student Achivment Award Award**<br>समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. संतोष वि. यादव द्वारा | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.ए. अंतिम वर्षामध्ये समाजशास्त्र विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| स्व. भाऊरावजी जाघव, विटाळा यांचे स्मृतिप्रीत्यर्थ<br>श्री ललितराव भा. जाधव यांचे कडून | |
| स्मृतिशेष महादेवराव पां.रामटेके, पुलगाव यांचे स्मृतिप्रीत्यर्थ<br>डॉ. भूषण म. रामटेके यांचे कडून रू. १००१/- | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.ए. अंतिम वर्षामध्ये मराठी विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रमाणपत्रासह देण्यात येईल. |

## महाविद्यालयातर्फे देण्यात येणारे विविध पारितोषिक

| | |
|---|---|
| स्मृतिशेष अनुसयाबाई म.रामटेके, पुलगाव यांचे स्मृतिप्रीत्यर्थ डॉ. भूषण म. रामटेके यांचे कडून रू. १००१/- | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.कॉम. द्वितीय वर्षामध्ये मराठी विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रमाणपत्रासह देण्यात येईल. |
| Indian Constitution, Student Achivment Award राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पद्माकर दारोंडे यांचे कडून | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.ए. अंतिम वर्षामध्ये राज्यशास्त्र विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| Indian Accountancy, Shri Kalyan Subramani Aiyar Award वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. विद्या चन्ने यांचे कडून | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.कॉम. अंतिम वर्षामध्ये सर्व विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| Philip Kotlar, Father of Marketing Award वाणिज्य विभाग प्रा. गिरीश गवई यांचे कडून | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.कॉम. अंतिम वर्षामध्ये मार्केटिंग विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| Modern Economics, Adam Smith Award अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गजानन जाणे यांचे कडून | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.ए. अंतिम वर्षामध्ये अर्थशास्त्र विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| हिंदी भाषागौरव संत कबिरदास पुरस्कार हिंदी विभाग प्राध्यापक डॉ. नितीन बनकर यांचे कडून | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.ए.व बी कॉम अंतिम वर्षामध्ये हिंदी विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |
| Father of English Geoffrey Chaucer Award इंग्रजी विभाग प्राध्यापिका डॉ. दीपाली चौकडे यांचे कडून | रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या बी.ए.व बी कॉम अंतिम वर्षामध्ये इंग्रजी विषयात पहिल्या प्रयत्नात पास होऊन सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांला स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. |

# महाविद्यालय विकास समिती COLLEGE DEVELOPMENT COMMITTEE

**Shri. Ajitkumar Patni**
Chairman

**Shri. Aditya Patni**
Member

**Dr. Padmakar Daronde**
One Head of Department

**Dr. Ku. Vidya Channe**
Teacher's Women Representative

**Prof. Santosh Yadav**
Teacher's Representative

**Prof. Girish Gawai**
Teacher's Representative

**Shri. Ramvijay Rathod**
Non- Teaching Representative

**Shri. Ashok Pohare**
Invited Member from Local

**Shri. Shreyash Chourasiya**
Invited Member from Local

**Shri. Ganesh Pote**
Invited Member from Local

**Shri Wasimuddin Quazi**
Invited Member from Local

**Dr. Kishor Dhumne**
I.Q.A.C. Co-ordinator

**Ku. Mayuri Ninave**
Students Girls Representative

**Shri. Gourav Varma**
Students Representative

**Dr. Bhushan Ramteke**
Principal & Secretary

# महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी सेल INTERNAL QUALITY ASSURANCE CELL

**Dr. Bhushan M. Ramteke**
Chairperson Officiating Principal

**Dr. Kishor M. Dhumne**
IQAC Coodinator

**Shri. Sagar W. Perke**
Senior Administrative Member

**Shri. Ramvijay S. Rathod**
Senior Administrative Member

**Prof. Santosh V. Yadav**
Senior Faculty Member

**Dr. Ku. Vidya P. Channe**
Senior Faculty Member

**Dr. Padmakar P. Daronde**
Senior Faculty Member

**Shri. Ajitkumar R. Patni**
Management Nominee Member

**Shri. Kiran V. Dhok**
Students & Alumni Nominee Member

**Ku. Meghana W. Waghdhare**
Students & Alumni Nominee Member

**Shri. Sandeep D. Dhomne**
Industrialists Nominee Member

**Shri. Santosh R. Kotgirwar**
Parents Nominee Member

**Dr. Gopal V. Helonde**
Nominee From Other Institute



# विविध प्रशासकीय समिती

# Verious Administrative Committees

## Admission Process Committee

Commerce-

| | |
|---|---|
| Prof. G. G. Gawai | Coordinator |
| Dr. V. P. Channe | Member |
| Shri. S. W. Perke | Member |

Arts-

| | |
|---|---|
| Dr. G. S. Jane | Coordinator |
| Dr. P. P. Daronde | Member |
| Prof. V. J. Pawar | Member |
| Shri. R. S. Rathod | Member |

## Discipline Committee

| | |
|---|---|
| Dr. V. P. Channe | Coordinator |
| Dr. G. S. Jane | Member |
| Dr. K. M. Dhumne | Member |
| Shri. S. W. Perke | Member |

## Premises Cleanliness Committee

| | |
|---|---|
| Dr. P. P. Daronde | Coordinator |
| Dr. G. S. Jane | Member |
| Shri. D. J. Saddam | Member |
| Shri. V. R. Mane | Member |

## Grievance Redressal Committee

| | |
|---|---|
| Dr. B. M. Ramteke | Coordinator |
| Dr. G. S. Jane | Member |
| Shri. S. W. Perke | Member |

## Women Grievance Committee

| | |
|---|---|
| Dr. Ku. V. P. Channe | Coordinator |
| Prof. S. V. Yadav | Member |
| Dr. K. M. Dhumne | Member |

## Cultural Activity Committee

| | |
|---|---|
| Prof. G. G. Gawai | Coordinator |
| Dr. G. S. Jane | Member |
| Shri. S. W. Perke | Member |

## Competitive Guidance Committee

| | |
|---|---|
| Prof. S. V. Yadav | Coordinator |
| Prof. G. G. Gawai | Member |
| Shri. S. W. Perke | Member |

## Environment Study Committee

| | |
|---|---|
| Prof. S. V. Yadav | Coordinator |
| Shri. R. S. Rathod | Member |

## Library Department Committee

| | |
|---|---|
| Dr. K. M. Dhumne | Coordinator |
| Prof. S. V. Yadav | Member |
| Dr. Ku. V. P. Channe | Member |

## NCC Unit Committee

| | |
|---|---|
| Dr. P. P. Daronde | Coordinator |
| Shri. R. S. Rathod | Member |

## Publication Committee

| | |
|---|---|
| Dr. B. M. Ramteke | Coordinator |
| Dr. K. M. Dhumne | Member |
| Prof. S. V. Yadav | Member |
| Shri. S. W. Perke | Member |

## Sport Dept. Committee

| | |
|---|---|
| Dr. G. S. Jane | Coordinator |

## महाविद्यालय प्राध्यापक व कर्मचारीवृंद

## COLLEGE STAFF

**Dr. Bhushan M. Ramteke**
Officiating Principal (Marathi)

**Prof. Vishnu J. Pawar**
Assistant Professor (History)

**Dr. Padmakar P. Daronde**
Assistant Professor (Political Science)

**Prof. Santosh V. Yadav**
Assistant Professor (Sociology)

**Dr. Kishor M. Dhumne**
Librarian

**Dr. Ku. Vidya P. Channe**
Assistant Professor (Commerce)

**Prof. Girish G. Gawai**
Assistant Professor (Commerce)

**Dr. Gajanan S. Jane**
Assistant Professor (Economics)

**Dr. Nitin A. Bankar**
Assistant Professor (CHB) (Hindi)

**Dr. Dipali K. Choukade**
Assistant Professor (CHB) (English)

**Prof. Subhash J. Pillewar**
Assistant Professor (CHB) (English)

**Shri. Sagar W. Perke**
Senior Clerk

**Shri. Ramvijay S. Rathod**
Junior Clerk

**Shri. Sandip M. Patil**
Library Attendand

**Shri. Vikas R. Mane**
Office Peon

**Shri. Digambar J. Saddam**
Office Peon

**Shri. Avinash V. Kamdi**
Office Peon

## सांस्कृतिक विभाग

## Cultural Department



विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना मिळण्याच्या व सर्वांगीण विकास कार्यक्रमाअंतर्गत सांस्कृतिक विभागाद्वारे दोन्ही सत्रामध्ये विविध जसे- चर्चासत्र, वादविवाद, परिसंवाद, सामान्य ज्ञान, कवि संमेलन, पथनाटय, काव्यवाचन,निबंधलेखन, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते तसेच केंद्र व राज्य सरकार, इतर प्रशासकीय कार्यालय यांचे द्वारा आयोजित कार्यक्रमांचे नियोजन महाविद्यालयात करण्यात येते.

**अधिक माहितीकरिता संपर्क** - प्रा. गिरीश गवई ( सांस्कृतिक विभाग प्रमुख )

## पर्यावरणशास्त्र विभाग

## Environment Science Department



आपल्या पर्यावरणाची जाणिव व विविधांगी मार्गदर्शन लाभण्याच्या दृष्टीने रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूरद्वारा द्वितीय वर्षास आवश्यक अशा पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची आखणी महाविद्यालयात करण्यात आली आहे. या अंतर्गत द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणशास्त्र प्रकल्प व परीक्षेस हजर राहणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यापीठाद्वारे गैरहजर विद्यार्थ्यांचा निकाल थांबविण्यात येतो. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

अधिक माहितीकरिता संपर्क - प्रा. संतोष यादव ( पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख )

## स्पर्धापरीक्षा व करिअर कट्टा

## Competitive Guidance & Career Katta

नियमित अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या भावी करीअरसाठी स्पर्धा परिक्षां जसे - बॅंक, प्रशासकीय सेवा, रेल्वे, पोलीस विभाग या सारख्या विविध परीक्षांचे मार्गदर्शन व वर्ग महाविद्यालयात तज्ज्ञ प्राध्यापकांद्वारे मोफत घेतले जातात.

अधिक माहितीकरीता संपर्क - डॉ. एस. व्ही. यादव ( स्पर्धा परीक्षा प्रमुख )



## एन. सी. सी. विभाग

## Department of NCC





पुलगाव व परिसरामध्ये एकमात्र सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालया येथे राष्ट्रीय छात्र सेना ( एन.सी.सी.) ची विशेष सोय आहे. छात्र सेनेत प्रवेश घेवून सैनिकी प्रशिक्षण घ्यावे. छात्रसेनेची सी सर्टीफिकेट परीक्षा उर्तीर्ण विद्यार्थ्यांस भारतीय सेनेत / पोलीस विभागात अधिकारी पदाची संधी उपलब्ध होते. आपण सुध्दा शिक्षणा सोबतच एन.सी.सी. चा अभ्यासक्रम पुर्ण करूण आपल्या उज्वल भविष्याची निश्चिती करावी.

मागील पाच वर्षाच्या कालावधीमध्ये एन.सी.सी. च्या माध्यमातून यशस्वी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या नावलौकिकामध्ये मानाचा तुरा रोवलेला आहे.

**Cdt. Pawan Dani**
Fireman, CAD, Pulgaon

**Cdt. Mangesh Mundhekar**
NATO Army Trainer, South Africa

**Cdt. Sukhsen Wasekar**
Security Officer

**Cdt. Aakash Meshram**
Home Guard

**Cdt. Rushabh Pachare**
Indian Army

**Cdt. Kunal Hadekar**
Indian Army

**Cdt. Chandu Parise**
Indian Army



Lt. Dr. P. P. Daronde

**NAAC Accredited 'B' Grade Institution**
















## सर्वांगीण विकास कार्यक्रम

- वार्षीक स्नेहमिलन
- चर्चासत्र
- वादविवाद
- परिसंवाद
- सामान्य ज्ञान स्पर्धा
- कवि संमेलन
- पथनाटय
- काव्यवाचन
- निबंध लेखन
- प्रश्न मंजुषा
- भित्तीपत्रक स्पर्धा
- रांगोळी स्पर्धा






लोकमत समाचार

# सुवालाल पाटनी कॉलेज के विद्यार्थियों को किया सम्मानित



कार्यक्रम में मार्गदर्शन करतीं विद्या चन्ने एवं छात्रा को पुरस्कृत करते प्राचार्य रामटेके.

**पुलगांव :** सुवालाल पाटनी कला व वाणिज्य महाविद्यालय में विद्यार्थियों के लिए जवाहर शिक्षा संस्था के सचिव आदित्य पाटनी की उपस्थिति में पुरस्कारों का वितरण किया गया. शैक्षिक पाठ्यक्रम एवं विविध कार्यक्रमों में उल्लेखनीय कार्य करनेवाले विद्यार्थियों को सम्मिनत किया गया. कार्यक्रम में प्राचार्य भूषण रामटेके, आर.के. महाविद्यालय के प्राचार्य नूरसिंग जाधव उपस्थित थे. कार्यक्रम का आयोजन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. विद्या चन्ने ने किया. संचालन प्रा. संतोष यादव ने किया.

पुण्य नगरी

# पाटणी महाविद्यालयाची औद्योगिक भेट



**पुलगाव :** स्थानिक सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वर्धा येथील एमआयडीसी परिसरातील उद्योगाला भेट देत तेथील माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमासोबतच प्रत्यक्ष यंत्रावर उत्पादन कशाप्रकारे घेतले जाते. याचा प्रत्यक्ष अनुभव यावा आणि किमान भांडवल गुंतवणूकीतून स्वतःचा उदरनिर्वाह करून रोजगार निर्मिती कशाप्रकारे करू शकतो, या उद्देशाने औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. अमोल तालेवार यांनी विद्यार्थी उज्ज्वल भविष्याची वाटचाल कशाप्रकारे करू शकतात. कॉरगेटिड बॉक्सचे उत्पादन पर्यावरण आणि सर्व प्रकारच्या पॅकींग उत्पादनाला कशाप्रकारे परस्पर पूरक असते, हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. या औद्योगिक भेटीचे आयोजन वाणिज्य विभागप्रममुख डॉ. विद्या चन्ने यांनी केले. प्रा. गिरीश गवई, डॉ. किशोर डुमणे, प्रा. संतोष यादव, वाणिज्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष दिव्यांश साहू, उपाध्यक्ष समिक्षा श्रीवास्तव, योगीने रंडळे, खुशी रावत, सचिव अमृता काठोके, कोषाध्यक्ष स्वाती शेंडे तसेच सदस्य उपस्थित होते. कला विभागातील सागर गलहात व इतरांनी सहकार्य केले.



कर्मयोगी गाडगेबाबा स्मृती
स्वच्छता अभियान प्रसंगी
कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी
श्री. अजित पाटणी
यांचे स्वागत करतांना
महाविद्यालयाचे
प्राचार्य डॉ. भूषण रामटेके



महाराष्ट्र शासनाच्या
वृक्षारोपण कार्यक्रमाच्या
निमित्याने महाविद्यालयात
परिसरात वृक्षारोपण
करतांना श्री. अजित पाटणी,
सौ. पूर्णिमा पाटणी ,
एन.सी.सी. कॅडेट व
कर्मचारी वृंद




महाविद्यालयातील
एन.सी.सी. युनिटच्या
वतीने पल्स पोलियो
शिबीराचे आयोजन



स्वातंत्र्य दिनाच्या
कार्यक्रमा
निमित्याने
उपस्थित प्रमुख
अतिथी
श्री. अजित पाटणी,
सौ. पूर्णिमा पाटणी
व प्राचार्य डॉ.
भूषण रामटेके

Published By
**DR. BHUSHAN RAMTEKE**
M.A., M.Phil. Ph.D, NET
Off. Principal
Suwalal Patni
Arts & Commerce College, Pulgaon
e-mail - spcollegepulgaon@rediffmail.com